

**श्री. शिवाजीराव बापुसाहेब देशमुख**
**मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद**

| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | १ सप्टेंबर १९३५. |
| **जन्मठिकाण** | : | तिळवणी, तालुका हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूर. |
| **शिक्षण** | : | बी.ए. (प्राथमिक शिक्षण कोकरुड येथे, माध्यमिक शिक्षण ब्रँच राजाराम हायस्कूल, कोल्हापूर व महाविद्यालयीन शिक्षण राजाराम कॉलेज, कोल्हापूर) |
| **ज्ञात भाषा** | : | मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : | विवाहित, पत्नी श्रीमती सरोजिनी. |
| **अपत्ये** | : | एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : | शेती. |
| **पक्ष** | : | अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय). |
| **मतदारसंघ** | : | महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. |
| **इतर माहिती** | : | १९५८ ते ६७ - सांगली जिल्हयामध्ये विस्तार अधिकारी या पदावर ९ वर्षे शासकीय सेवा; १९६७ मध्ये बिळाशी जिल्हा परिषद मतदारसंघातून सांगली जिल्हा परिषदेवर बिनविरोध निवड; १९७२-७४ कार्यकारी परिषद सदस्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी; १९६७-७२ सभापती, पंचायत समिती शिराळा; १९७२-७४ सभापती, कृषी समिती, जिल्हा परिषद, सांगली; १९६७ मध्ये कोयना येथे झालेल्या भूकंपामुळे विस्थापित झालेल्या शिराळा तालुक्यातील डोंगराळ/दुर्गम भागातील मदत कार्यबाबत राष्ट्रीय नेत्यांकडून गौरव; |

| | | |
|---|---|---|
| | | संचालक, विश्वास सहकारी साखर कारखाना, यशवंतनगर, चिखली; १९८० मध्ये महाराष्ट्रातील पहिली डोंगरी परिषद यशस्वीरित्या आयोजित केली तसेच, राज्यातील सुमारे ४० तालुक्यांचा डोंगरी विकास योजनेमध्ये समावेश करण्यात विशेष पुढाकार; १९७८-८०, १९८०-८५, १९८५-९०, १९९०-९५ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; फेब्रुवारी १९८३ ते मार्च १९८५ सामान्य प्रशासन, गृह, माहिती व जनसंपर्क आणि परिवहन या खात्यांचे राज्यमंत्री; मार्च १९८५ ते जून १९८५ कृषी, ऊर्जा व परिवहन (स्वतंत्र कार्यभार) राज्यमंत्री; जून १९८५ ते मार्च १९८६ पाटबंधारे आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री; जून १९८८ ते मार्च १९९० पुनर्वसन आणि ग्रामविकास मंत्री; मार्च १९९० ते जानेवारी १९९१ कृषी, फलोत्पादन, पुनवर्सन आणि ग्रामविकास मंत्री; जानेवारी १९९१ ते जून १९९१ सहकार व माजी सैनिकांचे कल्याण मंत्री; जून १९९१ ते सप्टेंबर १९९२ सहकार, संसदीय कार्य, माजी सैनिकांचे कल्याण आणि परिवहन मंत्री; मार्च १९९३ ते सप्टेंबर १९९४ सार्वजनिक बांधकाम, संसदीय कार्य, पुनर्वसन आणि माजी सैनिकांचे कल्याण मंत्री; १९९२-९६ अध्यक्ष, राज्य डोंगराळ विभाग निश्चितीकरण समिती; कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ; १९९२-९६ अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) कमिटी व सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस (आय) कमिटी; १९९६-२००२, २००२-२००८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २०००-२००१ या वर्षाचा राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे दिला जाणारा महाराष्ट्र विधान परिषदेतील **"उघ्कृष्ट भाषण"** पुरस्कार प्राप्त; आम्ही सांगलीकर या संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या **"सांगली भूषण"** पुरस्काराने २००७ मध्ये सन्मानित; १३ ऑगस्ट २००४ ते २४ एप्रिल २००८ सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद बिनविरोध निवड; |

| | | |
|---|---|---|
| | | एप्रिल २००८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; २५ एप्रिल २००८ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड. |
| **परदेश प्रवास** | : | २००५- युनायटेड किंगडमच्या संसदेने व राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या मुख्यालयाने लंडन येथे आयोजित केलेल्या संसदीय परिषदेसाठी सहभागी.<br>२००६- ५२ व्या राष्ट्रकुल मंडळाच्या अबूजा-नायजेरिया येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये महाराष्ट्र शाखेच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे प्रतिनिधी म्हणून सहभागी.<br>२००७- इस्लामाबाद-पाकिस्तान येथे भरलेल्या तिसऱ्या एशिया-भारत प्रादेशिक परिषदेला महाराष्ट्र शाखेच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे प्रतिनिधी म्हणून सहभागी. |
| **छंद** | : | वाचन, शैक्षणिक व सामाजिक कार्य. |
| **पत्ता** | : | (१) मु.पो. कोकरुड, तालुका शिराळा,<br>जिल्हा सांगली दूरध्वनी: (०२३४५) २२४११०.<br>(२) फ्लॅट नं.४०२, गोदावरी, वरळी सागर हौसिंग सोसायटी,<br>मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी: २४९६१०८०<br>(३) अजंठा, मलबार हिल,<br>नारायण दाभोळकर मार्ग,<br>मुंबई ४००००६. दूरध्वनी: कार्यालय -२२०२७३७३,<br>२२०२४०८६,<br>२२८४६६५९ (फॅक्स).<br>निवास - २३६३१६८२. |